गुरूकुल ट्रस्ट संचलित,

# तात्यासाहेब सामंत माध्यमिक विद्यालय, चाळीसगाव

## गुरूकुल ट्रस्ट विश्वस्त मंडळ

| अ.क्र. | विश्वस्ताचे नाव | पद |
|---|---|---|
| १. | श्री. लक्ष्मीकांत विष्णू पाठक | अध्यक्ष |
| २. | डॉ. श्री.हरिश रमाकांत दवे | विश्वस्त |
| ३. | श्री. घन:श्याम अनंत सामंत | विश्वस्त |
| ४. | सी.ए. श्री.विवेक वसंतराव काटदरे | विश्वस्त |
| ५. | डॉ. श्री. प्रसाद शंकर पाठक | विश्वस्त |

## शाळा समिती सन २०२५ - २६

| अ.क्र. | पदाधिकाऱ्याचे नाव | पद |
|---|---|---|
| १. | डॉ. श्री. हरिश रमाकांत दवे | चेअरमन |
| २. | डॉ. श्री. प्रसाद शंकर पाठक | सदस्य |
| ३. | श्री. चंद्रशेखर जगन्नाथ विंचुरकर | सदस्य |
| ४. | डॉ. राहुल अनंत कुलकर्णी | सदस्य |
| ५. | श्री. गोरख नामदेव सूर्यवंशी | मुख्याध्यापक व सचिव |
| ६. | सौ. संध्या सुनील दर्प | शिक्षक प्रतिनिधी |
| ७. | श्री. रविंद्र रतन चौधरी | शिक्षकेतर प्रतिनिधी |

## मनोगत

प्रिय पालक बंधु – भगिनी,

सप्रेम नमस्कार तसेच प्रिय विद्यार्थ्यांना अनकोत्तम शुभाशीर्वाद.

दरवर्षाप्रमाणे यावर्षीही शाळेच्या 'संवाद' वार्षिकातून आपणाशी संवाद साधतांना खूप आनंद होत आहे.

मुलांच्या आयुष्यात घर आणि शाळा ही दोन महत्त्वाची केंद्रे असतात. घरातून मुलांना संस्कार, प्रेम आणि आधार मिळतो, तर शाळेतून ज्ञान, शिस्त आणि योग्य दिशा मिळते. त्यामुळे मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी पालक आणि शाळा यांचे सहकार्य अत्यंत आवश्यक आहे.

आजच्या स्पर्धेच्या युगात मुलांना केवळ पुस्तकातील ज्ञान मिळणे पुरेसे नाही, तर त्यांच्यात चांगले संस्कार, आत्मविश्वास, प्रामाणिकपणा आणि मेहनतीची सवय असणेही तितकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी शिक्षणाबरोबरच क्रीडा, कला, सांस्कृतिक कार्यक्रम आणि विविध उपक्रम या सर्वांचे आयोजन शाळा करत असते.

पालक म्हणून आपणही मुलांना वेळ द्यावा त्यांच्या अभ्यासाकडे लक्ष द्यावे, त्यांना चांगल्या सवयी लावाव्यात आणि त्यांचे मन समजून घ्यावे. मुलांचे कौतुक केल्याने त्यांना प्रोत्साहन मिळते आणि त्यांचा आत्मविश्वास वाढून ते अधिक चांगले कार्य करण्यासाठी प्रेरित होतात.

शाळेवर आपण दाखवलेला विश्वास आमच्यासाठी खूप मोलाचा आहे. आपल्या सहकार्यामुळे आम्ही विद्यार्थ्यांसाठी उत्तम शिक्षण आणि चांगले वातावरण निर्माण करु शकतो.

धन्यवाद...!

**डॉ. श्री. हरिश रमाकांत दवे**
**चेअरमन,**
**तात्यासाहेब सामंत माध्य. विद्यालय, चाळीसगाव**

# शालेय वृत्त

**''विद्वत्वं च नृपत्वं च नैव तुल्यं कदाचन।**
**स्वदेशे पूज्यते राजा विद्वान् सर्वत्र पूज्यते।।''**

प्रिय पालक बंधू, भगिनी व विद्यालयाचे हितचिंतकहो,

सस्नेह नमस्कार,

**''नव्या युगाची हाक आम्हाला,**
**झेप आमुची यशाकडे,**
**कठोर श्रम अन् यत्ने करोनि,**
**गति आमुची पुढे - पुढे ''**

**१) माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (एस.एस.सी.)**

मार्च २०२५ मध्ये झालेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेत १४६ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. विद्यालयाचा निकाल १००% लागला. **कु. श्रावणी सुनिल कोठावदे ही विद्यार्थीनी ९७.८०% गुण मिळवून विद्यालयातून प्रथम आली.**

**तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांमधून कु. तनुश्री लक्ष्मण माने ही विद्यार्थीनी ९५.४०% गुण** मिळवून विद्यालयातून प्रथम आली.

## उत्तीर्णतेची श्रेणी निहाय वर्गवारी

| श्रेणी | विशेष श्रेणी | प्रथम श्रेणी | द्वितीय श्रेणी | एकूण |
|---|---|---|---|---|
| उत्तीर्ण विद्यार्थी | १४३ | ०३ | -- | १४६ |
| टक्केवारी | ९७.९४% | २.०६ | -- | १००% |

.

# अवांतर स्पर्धा परीक्षा

आमच्या विद्यालयात शालेय अभ्यासाला पूरक अशा विविध अवांतर परीक्षांना प्रविष्ट होण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले जाते व मार्गदर्शनही केले जाते. या वर्षी आमच्या विद्यालयाचे विद्यार्थी विविध परीक्षांना प्रविष्ट होऊन त्यांनी पुढील प्रमाणे यश संपादन केले.

## ● पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा – २०२५

**※ सन २०२५ मध्ये इ.५वी तील पुढील विद्यार्थ्यांनी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत पुढीलप्रमाणे यश मिळवले.**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | चि. भामरे आयुष योगेश | – | जिल्ह्यातून २२ वा क्र. |
| २) | कु. कोठावदे चार्वी भूषण | – | जिल्ह्यातून २३ वा क्र. |
| ३) | चि. पाटील मनित प्रदीप | – | जिल्ह्यातून १८४ वा क्र. |
| ४) | चि. पाटील शाश्वत मिलिंद | – | जिल्ह्यातून २१४ वा क्र. |
| ५) | कु. राणा सिद्धी कांचन | – | जिल्ह्यातून २२८ वा क्र. |

**※ सन २०२५ मध्ये इ.८ वी तील पुढील विद्यार्थ्यांनी माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत पुढीलप्रमाणे यश मिळवले.**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | चि. चौधरी वंशदीप विजय | – | जिल्ह्यातून ३८ वा क्र. |
| २) | चि. पाटील शिव समीर | – | जिल्ह्यातून ७४ वा क्र. |
| ३) | चि. वाघ भाग्येश सचिन | – | जिल्ह्यातून ८६ वा क्र. |
| ४) | कु. देशमुख सिद्धी दीपक | – | जिल्ह्यातून ११८ वा क्र. |

**※ डिसेंबर २०२५ मध्ये झालेल्या NMMS परीक्षेस विद्यालयातून इ.८वी चे एकूण ४३ विद्यार्थी प्रविष्ट झाले.**

**※ शासकीय रेखाकला परीक्षा –**

**दिनांक १० जानेवारी २०२६ रोजी ड्रॉईंग ग्रेड परीक्षेचा निकाल जाहीर झाला. दोन्ही परीक्षांचा निकाल १००% लागला. तो पुढीलप्रमाणे –**

**※ शासकीय रेखाकला परीक्षा एलिमेंटरी परीक्षेत ५१ विद्यार्थी प्रविष्ट तसेच इंटरमिजीएट परीक्षेत २९ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. पैकी सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले.**

| | एलिमेंटरी | इंटरमिजीयट |
|---|---|---|
| A ग्रेड | ०३ | ०५ |
| B ग्रेड | ०६ | ११ |
| C ग्रेड | ४२ | १६ |

**※ एलिमेंटरी 'A' ग्रेड प्राप्त विद्यार्थी –**

१) चि. सुशांतसिंग सतिषसिंग राजपूत – ७ वी वल्लभी
२) कु. लावण्या रामचंद्र येवले – ८ वी वल्लभी
३) कु. प्राची ज्ञानेश्वर गुंजाळ – ८ वी तक्षशिला

**※ इंटरमिजीयट A ग्रेड प्राप्त विद्यार्थी –**

१) चि. चिराग लाला कोथेकर – ८ वी तक्षशिला
२) कु. अक्षदा शरद भोईटे – ९ वी वल्लभी
३) कु. नंदिनी दीपक राजपूत – ९ वी वल्लभी
४) कु. श्रुती मनोज ब्राह्मणकार – ९ वी वल्लभी
५) कु. सिद्धी दिपक देशमुख – ९ वी वल्लभी

## आंतरशालेय स्पर्धा सहभाग व यश

※ टिळक महाराष्ट्र विद्यापीठातर्फे संस्कृत भाषा परिचय संस्कृत भाषा जिज्ञासा या परीक्षेस २०२५ मध्ये विद्यालयातील एकूण १२ विद्यार्थी प्रविष्ट झाले. त्यामध्ये इ.९वी तक्षशिलेतील चि. चेतन विशाल पाटील हा ९० गुण मिळवून विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाला.

**※ दिनांक १० ऑगस्ट २०२५ –**

रोजी महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे शाखा चाळीसगाव तर्फे कथाकथन व निबंध स्पर्धेचे आयोजन केले गेले. यात २५ विद्यार्थी सहभागी झाले.

कथाकथन स्पर्धेत ८ वी ते १० वीच्या गटातून इ.९वी वल्लभी ची विद्यार्थीनी कु. अक्षदा शरद भोईटे हिला तृतीय क्रमांक मिळाला व इ.५ वी ते ७ वी च्या गटातून इ.६वी तक्षशिलेची विद्यार्थीनी कु.कादंबरी शरद पाटील हिला द्वितीय क्रमांक प्राप्त झाला.

**※ दिनांक १० ऑगस्ट २०२५ –**

रोजी महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे शाखा चाळीसगाव तर्फे निबंध स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत इयत्ता १० वी तील विद्यार्थीनी कु. श्रावणी यशोदीप जगताप हिने द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

**※ दिनांक १५ ऑगस्ट २०२५ –**

संस्कार भारती शाखा चाळीसगाव तर्फे स्वातंत्र्यदिनानिमित्त समूहगीत गायन स्पर्धेत विद्यालयातील इ. ५ वी ते इ. ९ वी चे ६ गट सहभागी झाले होते त्यात.

※ मोठा गट इ. ८ वी ते १० वी **'क्रांती की मशाल से'** या गीताला **प्रथम** क्रमांक प्राप्त –

सहभागी विद्यार्थी

१) कु. देशमुख मुक्ता सतीश
२) कु. गोसावी जिविका संदीप
३) कु. पाटील सिद्धी प्रदीप
४) कु. पाटील यशश्री सुदाम
५) कु. पाटील आयुषी युवराज
६) कु. जगताप श्रावणी यशोदीप
७) कु. भामरे युक्ता भूषण
८) कु. जाधव त्रिशा मंगेश

इ.५ वी ते ७ वी च्या लहान गटातून **'सुरसंगम ताल संगम'** या गीताला **तृतीय** क्रमांक प्राप्त झाला.

त्यातील सहभागी विद्यार्थी पुढील प्रमाणे –

१) कु. चव्हाण पियुषा निलेश
२) कु. चव्हाण समृद्धी प्रमोद
३) कु. पवार श्रेया कैलास
४) कु पवार ग्रीष्मा नरेंद्र
५) चि. काळे कौस्तुभ अनिल
६) चि. चौधरी हितेश सुरेश
७) चि. पाटील आदित्य विकास
८) चि निकुंभ सार्थ नरेश

※ इयत्ता ८ वी ते इ. १० वी या मोठ्या गटातून **'जगी घुमवारे'** या गटाला **उत्तेजनार्थ** बक्षीस मिळाले.

सहभागी विद्यार्थी –

१) कु. चव्हाण आर्या सुनील
२) कु. पाटील स्नेहा संदीप
३) कु. नेरकर आकांक्षा शांताराम
४) कु. गोसावी नेहा भिमगीर
५) कु. नाईक गितांजली सुनील
६) कु. चौधरी कश्यपी चेतन
७) कु. नगराळे आसावरी छोटुभाऊ

**※ दिनांक २५ ऑगस्ट २०२५ रोजी व ३० ऑगस्ट २०२५ –**

रोजी झालेल्या अखिल भारतीय विज्ञान मेळावा स्पर्धेत विद्यालयातील इ.१०वी तील कु. मानसी प्रकाश पाटील हिने तालुकास्तरावरील स्पर्धेत द्वितीय तसेच जिल्हास्तरीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

स्पर्धेचा विषय – **'क्वांटम युगातील संभाव्यता व आव्हाने.'**

विभागस्तर स्पर्धेसाठी ती पात्र ठरली.

**※ दिनांक ९ सप्टेंबर २०२५ –**

रोजी वाकोद, ता.जामनेर, जि.जळगाव येथे झालेल्या श्रीमती कांताबाई जैन स्मृती राज्यस्तरीय वक्तृत्त्व स्पर्धेत इ. ५ वी ते ७ वी लहान गटातून १ विद्यार्थी व इ. ८ वी ते १० वी च्या गटातून १ असे २ विद्यार्थी सहभागी झाले.

# संवाद

*** दिनांक ९ सप्टेंबर २०२५ –**

रोजी पंचायत समिती, चाळीसगाव तर्फे तालुकास्तरीय विज्ञान नाट्योत्सव स्पर्धेचे आयोजन केले गेले. सदर स्पर्धेत चाळीसगाव तालुक्यातून ९ शाळांनी सहभाग नोंदविला.

त्यात आपल्या विद्यालयाचा प्रथम क्रमांक आला, त्या नाटकाचा विषय **'स्मार्ट शेती'**असा होता.

नाटकातील सहभागी विद्यार्थी पुढीलप्रमाणे –

१) चि. रोहित प्रदीप काळे
२) कु. मनस्वी रवींद्र पाटील
३) कु. यशश्री सुदाम पाटील
४) कु. केशवी अविनाश पाटील
५) कु. ईशिका बबन पाटील
६) चि. वेदांत सतिष देशमुख
७) चि. सोहम विलास पाटील
८) चि. चेतन विशाल पाटील

*** दिनांक १३ सप्टेंबर २०२५ –**

रोजी मराठी विज्ञान परिषद मुंबई तर्फे राज्यस्तरीय विज्ञान स्पर्धेचे आयोजन नाशिक येथे करण्यात आले यात एकूण ८ विद्यार्थ्यांनी एकांकिका सादर केली. त्यांना विभाग स्तरावर द्वितीय क्रमांक मिळाला.
**विषय – 'लीस माइटनर कहाणी एका स्त्री शास्त्रज्ञाची'**

सहभागी विद्यार्थी –

१) कु. कश्यपी चेतन चौधरी
२) कु. भुवी किशोर पाटील
३) चि. श्रेयस दादाभाऊ झोडगे
४) चि. शिव समीर पाटील
५) चि. आदित्य अनिल राजपूत
६) चि. इशांत विजयानंद सुर्यवंशी
७) चि. भावेश भिमसिंग परदेशी
८) चि. वंशदीप विजयराव चौधरी

*** दिनांक १५ सप्टेंबर २०२५ –**

मातृमंदीर विश्वस्त संस्था निगडी पुणे तर्फे राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले यात, इ.१० वी ची विद्यार्थीनी कु. आयुषी युवराज पाटील हिने उत्तेजनार्थ बक्षीस मिळवले.

*** दिनांक २१ सप्टेंबर २०२५ –**

रोजी स्व.बाबासाहेब के.नारखेडे स्मृती राज्यस्तरीय निबंधलेखन, वक्तृत्त्व, उत्स्फूर्त वक्तृत्त्व, सुगम संगीत अशा स्पर्धांमध्ये आपल्या विद्यालयातील इ.५ वी ते १० वीतून एकूण ९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

यापैकी कु. चार्वी भूषण कोठावदे हिने निबंध स्पर्धेत द्वितीय तसेच **कु. अक्षदा शरद भोईटे** हिने उत्स्फूर्त वक्तृत्त्व स्पर्धेत **तृतीय** क्रमांक प्राप्त केला.

*** दिनांक २५ सप्टेंबर २०२५ –**

रोजी शेठ नारायण बंकट वाचनालय चाळीसगाव तर्फे **स्व.प्रा.सौ.मंदाताई व स्व.डॉ.शा.वा.देव स्मृती करंडक वक्तृत्त्व स्पर्धेचे** आयोजन करण्यात आले यात विद्यालयातील २ विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेत **कु. दीपश्री ज्ञानेश्वर साळुंखे** हिने तालुकास्तरावर प्रथम क्रमांक प्राप्त केला.

**विषय – वाचू आनंदे.**

**⁕ दिनांक १५ ऑक्टोबर २०२५ –**

रोजी वाचन प्रेरणादिनानिमित्त राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन ऑनलाइन करण्यात आले. यात इ.८ वी ची विद्यार्थीनी **कु. धनश्री जालमसिंग सोळंकी** हिने उल्लेखनीय यश संपादन केले.

**⁕ दिनांक २५ नोव्हेंबर २०२५ –**

रोजी जळगाव जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ, जळगाव तर्फे तालुकास्तरीय वक्तृत्त्व स्पर्धा डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालय येथे झाली, त्यात २ विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला.

**⁕ दिनांक ३० नोव्हेंबर २०२५ –**

विवेकानंद प्रतिष्ठान, जळगाव तर्फे कुमार साहित्य संमेलनासाठी निवड चाचणी दिनांक रोजी संपन्न झाली. त्या चाचणीत विद्यालयातील विद्यार्थ्यांची कथाकथन, अभिवाचन व काव्यवाचनासाठी निवड करण्यात आली. निवड झालेले विद्यार्थी–

**अभिवाचन गट क्र. १ विषय – शिक्षणाचे महत्त्व**

१) कु. क्रिशिका किरण गवळी
२) कु. वैष्णवी समाधान पारधी
३) कु. आस्था हर्षल बिसावा
४) कु. आराध्या गणेश बोरसे
५) कु. आरोही योगेश बोरसे

**गट क्र.२ – विषय – चकवा**

१) कु. अक्षरा दिलीप साठे
२) कु. दीपश्री ज्ञानेश्वर साळुंखे
३) कु. आयुषी युवराज पाटील

**काव्यवाचन स्पर्धेतील विद्यार्थी –**

१) चि. चेतन विशाल पाटील
२) चि. भावेश रवींद्र पाटील

या सर्वांनी दिनांक २० डिसेंबर २०२५ रोजी कुमार साहित्य संमेलनात अभिवाचन व काव्यवाचन सादर केले.

**⁕ दिनांक १० डिसेंबर २०२५ –**

रोजी तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या प्रदर्शनात माध्यमिक गटातून २ विद्यार्थी सहभागी झाले. त्यांनी **'रेल्वे ट्रॅकींग'** यावर उपकरण तयार केले. तसेच शिक्षकांच्या गटातून श्री. **अमोल येवले सर** यांना प्राथमिक शिक्षक गटातून द्वितीय पारितोषिक मिळाले.

**विषय – मानवी स्नायु संस्था**

**⁕ दिनांक ३० डिसेंबर २०२५ –**

रोजी आनंदीबाई बंकट हायस्कूल येथे परिच्छेद पाठांतर स्पर्धा घेण्यात आली. त्यात ३ विद्यार्थी सहभागी झाले. त्यातून **चि. तेजस निलेश देसले** हा **उत्तेजनार्थ** आला.

# संवाद

*** दिनांक २३ जानेवारी २०२६ –**

रोजी हिंद – दि – चादर श्री. तेगबहादूर साहेबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त चाळीसगाव तालुकास्तरीय समिती व शिक्षण विभाग पंचायत समिती चाळीसगाव यांच्या तर्फे बंजारा नृत्य स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्यात इ.७ वी तील विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला व त्यात त्यांना द्वितीय क्रमांक प्राप्त झाला.

**सहभागी विद्यार्थीनी –**

| | |
|---|---|
| १) कु. क्रिशिका गवळी | २) कु. आर्या देशमुख |
| ३) कु. कार्तिकी राजपूत | ४) कु. आस्था बिसावा |
| ५) कु. अवंतिका देसले | ६) कु. किरण शिनकर |
| ७) कु. आरोही बोरसे | ८) कु. ग्रीष्मा पवार |
| ९) कु. प्राची सूर्यवंशी | १०) कु. देवयानी सोनार |
| ११) कु. आर्या गवळी | |

*** दिनांक १५ ते २४ जानेवारी –**

शासनातर्फे आलेल्या परिपत्रकानुसार गुरु तेगबहादूर यांच्या जीवनावर आधारीत हिंद – दि – चादर उपक्रमांतर्गत विद्यालयात विविध उपक्रम राबविण्यात आले.

*** दिनांक २७ जानेवारी २०२६ –**

रोजी मातृमंदिर विश्वस्त संस्था, पुणे आयोजित २०० पेक्षा अधिक विद्यार्थी समूहगीत गायन स्पर्धा, तसेच शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी समूहगीत गायन स्पर्धा आणि २५ पेक्षा अधिक विद्यार्थ्यांची सूर्यनमस्कार स्पर्धा आयोजित करण्यात आली. यात इ. ५ वी ते ८ वी चे एकूण ३७० विद्यार्थी सहभागी झाले. त्यांनी **'संपूर्ण वंदेमातरम्'** गायले. तसेच शाळेतील शिक्षकांनी **'क्रांती की मशाल को'** हे गीत सादर केले. या स्पर्धेत विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या समूहगीताला उत्तर महाराष्ट्र विभागातून **प्रथम क्रमांक** प्राप्त झाला.

*** दिनांक १० फेब्रुवारी २०२६ –**

रोजी रामकृष्ण विवकानंद सेवा संस्था, चाळीसगाव यांच्या वतीने स्वामी विवेकानंद जयंती निमित्त वक्तृत्त्व स्पर्धा आयोजित करण्यात आली. यात विद्यालयातील ६ विद्यार्थी सहभागी होते. यापैकी लहान गटातून **चि. शाश्वत मिलिंद पाटील** (इ.६वी) याला प्रथम व **कु.अर्णवी राकेश कोतकर** (इ.६वी) हिला द्वितीय क्रमांक तसेच मोठ्या गटातून **कु.अक्षदा शरद भोईटे** (९ वी) हिला द्वितीय क्रमांक प्राप्त झाला.

*** दिनांक ९ फेब्रुवारी २०२६ –**

रोजी सामाजिक वनीकरण विभाग जळगाव तर्फे इकोक्लब शाळांमार्फत प्रकल्प प्रदर्शन स्पर्धा आयोजित करण्यात आली. यात विद्यालयातील दोन प्रकल्प सादर करण्यात आले.

# सहशालेय व अभ्यासेतर उपक्रम

*** दिनांक १५ जून २०२५ –**

रोजी शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

*** दिनांक २१ जून २०२५ –**

रोजी गुरुकुल ट्रस्ट, चाळीसगाव यांच्या सर्व शाखांचा आंतरराष्ट्रीय योगदिन महोत्सव शिवाजी चौक येथे साजरा करण्यात आला, यामध्ये सर्व विद्यार्थ्यांनी सूर्यनमस्कार व विविध योगासने सादर केली.

*** दिनांक २३ जून २०२५ –**

रोजी सौ. संध्या दर्प मॅडम यांनी विद्याव्रत प्रस्तावना केली.

*** दिनांक २४ जून २०२५ –**

विद्याव्रत संस्कारांतर्गत श्री. विवेक देशपांडे सरांनी **'शारीरिक विकसन'** याबद्दल मार्गदर्शन केले.

*** दिनांक २५ जून २०२५ –**

रोजी विद्याव्रत संस्कारांतर्गत श्री.अमोल येवले सरांनी **'मानसिक विकसन'** या बद्दल मार्गदर्शन केले.

*** दिनांक २६ जून २०२५ –**

रोजी, विद्याव्रत संस्कारांतर्गत सौ. शीतल देशपांडे मॅडम यांनी **'बौद्धिक विकसन'** याबद्दल मार्गदर्शन केले.

*** दिनांक २७ जून २०२५ –**

रोजी विद्याव्रत संस्कारांतर्गत श्री.रविंद्र देशपांडे सरांनी **'अध्यात्मिक विकसन'** याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

*** दिनांक १ जुलै २०२५ –**

रोजी विद्यारंभ उपक्रमांतर्गत इ.५ वी च्या विद्यार्थ्यांसाठी विद्यारंभ कार्यक्रमाचे आयोजन केले गेले. याअंतर्गत विद्यार्थ्यांनी संकल्प केले.

*** दिनांक ३ जुलै २०२५ –**

रोजी सौ. संध्या दर्प मॅडम व सौ. मानसी कुलकर्णी मॅडम यांनी विद्याव्रत संस्कार उपासनेने कार्यक्रमाची सांगता केली.

*** दिनांक ६ जुलै २०२५ –**

रोजी, आषाढी एकादशी निमित्त विद्यालयाचा दिंडी सोहळा संपन्न झाला. त्यावेळी संस्थेचे अध्यक्ष मा. प्रा. ल. वि. पाठक, संस्थेचे सचिव डॉ. हरिश दवे, संस्थेचे शिक्षण विभाग प्रमुख मा. श्री. चंद्रशेखर विंचुरकर व मा. मुख्याध्यापक श्री. गोरख सुर्यवंशी सर व पालक शिक्षक यांच्या हस्ते पालखी पूजन करण्यात आले.

**※ दिनांक १० जुलै २०२५ –**

रोजी गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात आला. यानिमित्त इ.५ वी च्या विद्यार्थ्यांनी मातृ–पितृ पूजन केले. तसेच व्यासपौर्णिमेनिमित्त पालक डॉ. श्री. नरेश निकुंभ सरांनी गुरु महती सांगितली.

**※ दिनांक ५ ऑगस्ट २०२५ –**

रोजी विद्यालयातील इ. ५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी झाली. यासाठी डॉ. सुनील कोठावदे, डॉ. चंद्रकला चव्हाण, डॉ.सुनिता राठोड उपस्थित होत्या.

**※ दिनांक ७ ऑगस्ट २०२५ –**

रोजी शहरातील अंधशाळेत रक्षाबंधन कार्यक्रम संपन्न झाला. तेथे इ. ७ वी चे विद्यार्थी व अंध शाळेतील विद्यार्थी यांनी परस्परांना राखी बांधली व सहभोजन केले.

**※ दिनांक १३ ऑगस्ट २०२५ –**

रोजी विद्यालयातील इ. ६वी च्या विद्यार्थ्यांनी श्री. अमोल येवले सर यांच्या मार्गदर्शनाखाली कागदी बैल बनविले.

**※ दिनांक १६ ऑगस्ट २०२५ –**

रोजी विद्यालयात दहीहंडी व गोपाळकाला आयोजित केला होता. या उत्सवात इ.५ वीचे दोन्ही वर्ग तसेच वर्गशिक्षक उपस्थित होते. दहीहंडी नंतर सर्वांना गोपालकाला वाटप करण्यात आला.

तसेच विद्यालयातील इ. ७ वीच्या विद्यार्थ्यांनी श्री. अमोल येवले सर यांच्या मार्गदर्शनाखाली शाडू मातीपासून गणेशमूर्ती बनविल्या.

**※ दिनांक २५ ऑगस्ट २०२५ –**

रोजी विद्यालयाचा वार्षिक (दाते) पारितोषिक वितरण समारंभ (भाग –१) संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. डॉ. श्री. हरीश दवे (चेअरमन–ता.सा.मा.वि.चाळीसगाव) हे होते तर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी मा. श्री. सौरभ दत्तात्रय जोशी (मुख्याधिकारी चाळीसगाव नगरपरिषद चाळीसगाव) हे होते.

**※ दिनांक ३ सप्टेंबर २०२५ –**

रोजी गणेशोत्सवानिमित्ताने शालेय वक्तृत्त्व स्पर्धेची अंतिम फेरी घेण्यात आली. यात एकूण १८ विद्यार्थी सहभागी होते. याचे परीक्षण सौ.श्रद्धा देशपांडे मॅडम व श्री.अभय देवरे सर यांनी केले.

**※ दिनांक ४ सप्टेंबर २०२५ –**

रोजी विद्यालयात इंग्रजी संभाषण स्पर्धा आयोजित करण्यात आली, यात विद्यालयातील इ. ७ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांचे १० गट सहभागी झाले होते.

# संवाद

**※ दिनांक १५ सप्टेंबर २०२५ –**

रोजी हिंदी दिनानिमित्त इ. ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांसाठी हिंदी **'कहाणी कथन'** उपक्रम संपन्न झाला. यामध्ये एकूण ४१ विद्यार्थी सहभागी होते.

**※ दिनांक ११ सप्टेंबर २०२५ –**

रोजी इ. ६ वीच्या दोन्ही वर्गातील विद्यार्थ्यांनी चाळीसगाव नगरपरिषदेस भेट दिली व तेथील कामकाज समजवून घेतले.

**※ दिनांक २४ सप्टेंबर २०२५ –**

रोजी विद्यालयात स्वच्छता पंधरवडा निमित्त स्लोगन स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत विद्यार्थ्यांना पर्यावरण, सिंदूर, राष्ट्रप्रथम, स्वदेश, आत्मनिर्भर भारत असे विषय देण्यात आले होते.

**※ दिनांक १४ नोव्हेंबर २०२५ –**

रोजी संस्कृत अंताक्षरी स्पर्धा घेण्यात आली, यात इ. ८ वी ते १० वी चे ६ गट सहभागी झाले होते. यातून ३ गट विजयी झाले.

**※ दिनांक ९ डिसेंबर २०२५ –**

रोजी गुरुकुल ट्रस्ट संचलित तिन्ही शाखांचा स्नेहसंमेलन सोहळा पार पाडला. यात माध्यमिक विभागाचे इ.५ वी ते ८ वी चे सर्व विद्यार्थी सहभागी होते. तसेच इ. ९ वी व १० वी चे विद्यार्थी निवेदन व स्वयंसेवक म्हणून सहभागी होते. स्नेहसंमेलनाचा विषय **'जागर लोकनृत्याचा'** असा होता. यात संपूर्ण शाळेने पूर्ण 'वंदे मातरम्' ने स्नेहसम्मेलनाची सांगता केली.

**※ दिनांक २२ डिसेंबर २०२५ –**

रोजी भारतीय गणिततज्ज्ञ रामानुजन यांच्या जयंतीनिमित्त गणित दिवस साजरा करण्यात आला. या निमित्त इ. ५ वी ते ६ वीसाठी गणितीय रांगोळी स्पर्धा तसेच इ. ७ वी ते इ. ८ वी साठी मापन अंदाज स्पर्धा आयोजित करण्यात आली.

**※ दिनांक ८ जानेवारी २०२६ –**

रोजी इ. ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांना रोटरी क्लबच्या वतीने 'सितारे जमीन पर' चित्रपट दाखविण्यात आला.

**※ दिनांक १५ जानेवारी २०२६ –**

रोजी सामाजिक वनीकरण,नाशिक अंतर्गत मुलांना वन विभागांची माहिती व्हिडीओद्वारे करुन दिली.

**※ दिनांक २८ जानेवारी २०२६ –**

रोजी विद्यालयातील इ. ७ वीच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल वेरुळ येथे आयोजित करण्यात आली. भारत सरकारच्या पर्यटन विभागाच्या मार्गदर्शकामार्फत लेण्यांची विस्तृत माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

# संवाद

**※ दिनांक २९ जानेवारी २०२६–**

रोजी मराठी राजभाषा दिन साजरा करण्यात आला. यात नाट्यछटा, अभिवाचन, काव्यवाचन, ललित गद्यवाचन, पोवाडा, नाटिका, एकपात्री प्रयोग यांसारख्या कार्यक्रमांचे आयोजन केले गेले.

**※ दिनांक ३० जानेवारी २०२६ –**

रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी करण्यात आली. यात इ. ५ वी ब व ६ वीच्या वर्गातील ३५ विद्यार्थ्यांनी भाषणे सादर केली.

**※ दिनांक ४ फेब्रुवारी २०२६ –**

रोजी इ. ७ वीच्या दोन्ही वर्गातील विद्यार्थ्यांनी शेठ ना. बं. वाचनालयास भेट दिली.

**※ दिनांक १७ फेब्रुवारी २०२६ –**

रोजी विद्यालयाचा पारितोषिक वितरण समारंभ भाग–२ संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष गुरुकूल ट्रस्टचे सचिव मा.डॉ.हरिश दवे व प्रमुख अतिथी विद्यालयाची माजी विद्यार्थिनी मा.डॉ.तन्वी कौस्तुभ पाटील (कान नाक घसा तज्ज्ञ) या होत्या.

**※ २० फेब्रुवारी २०२६ –**

रोजी विद्यालयात छ. शिवाजी महाराज जयंती निमित्त इ. ५ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांनी शिवरायांचा दैदिप्यमान इतिहास, गनिमी कावा, गडकिल्ले यांची माहिती वक्तृत्त्व, पोवाडा या माध्यमातून दिली.

**※ दिनांक २७ फेब्रुवारी २०२६–**

रोजी विद्यालयात विज्ञान दिन साजरा करण्यात आला. यात इ. ९ वी वल्लभीची विद्यार्थीनी कु. अक्षदा शरद भोईटे हिने वक्तृत्व तसेच इ.७ वी ते ९ वी च्या विद्यार्थ्यांनी 'लिझ माईटनर' व 'स्मार्ट शेती' या नाटिका सादर केल्या.

**※ दिनांक २७ फेब्रुवारी २०२६–**

रोजी मराठी राजभाषा गौरवदिन साजरा करण्यात आला. त्यात डॉ. श्री. निलेश देशपांडे यांनी मराठी भाषेचे महत्त्व सांगितले. शाळेच्या सांस्कृतिक विभागप्रमुख श्रीमती सुनिता घाटे यांनी 'ती फुलराणी एकपात्री नाटक सादर केले. तसेच शाळेतील शिक्षक श्री.रवींद्र देशपांडे व त्यांचे सहकारी यांनी 'निसर्ग' यावर अभिवाचन सादर केले.

**※ दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ –**

रोजी इ. ६ वी, ७ वी व ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी विज्ञान खेळणी तयार करणे, हा उपक्रम घेण्यात आला. यात BASSE मुंबईचे CEO मा. प्रा. डॉ.श्री. अभय यावलकर यांनी विद्यार्थ्यांना विविध विज्ञान खेळणी बनविण्यासाठी मार्गदर्शन केले.

# क्रीडा विशेष

## 'खिलाडू वृत्तीचा स्वीकार करता, त्यातूनच दिसते यशाची वाट
## उमेदीने उभे राहता, उजळून निघते नवी पहाट'

**※ दिनांक १८ ऑगस्ट २०२५–**

रोजी तालुकास्तरीय शालेय बॅडमिंटन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात १४ वर्षांआतील मुले व १७ वर्षांआतील मुले व मुली या गटात विद्यालयातील ८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

**※ दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ –**

रोजी क्रीडा व युवक सेवा संचलनालय पुणे आयोजित शासकीय शालेय तालुकास्तरीय बुद्धीबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये १४ वर्षे वयोगटातील मुलींमध्ये इ. ८ वीची विद्यार्थीनी कु. अर्शती केदार चावरे ही तालुक्यातून द्वितीय आली.

**※ दिनांक ८ सप्टेंबर २०२५ –**

रोजी तालुकास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यात इ. ९ वी व इ. १० वी तील दोन विद्यार्थीनींनी सहभाग नोंदवला.

**※ दिनांक १० सप्टेंबर २०२६ –**

रोजी तालुकास्तरीय शालेय कुस्तींचे आयोजन करण्यात आले. यात विद्यालयातील इ. १० वीतील दोन विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

**※ दिनांक १९ सप्टेंबर २०२६ –**

रोजी क्रीडा व युवक सेवा संचलनालय, पुणे आयोजित शासकीय शालेय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या मध्ये विद्यालयातील १७ वर्षाआतील मुले व मुली हे संघ सहभागी झाले होते.

**※ दिनांक २३ सप्टेंबर २०२५ –**

रोजी क्रीडा व युवक सेवा संचलनालय, पुणे आयोजित शासकीय जिल्हास्तरीय वुशु स्पर्धेचे आयोजन करण्यात आले, या स्पर्धेत इ. ८ वीतील विद्यार्थ्याने यशस्वी सहभाग नोंदवला.

**※ दिनांक २६ सप्टेंबर २०२५ –**

रोजी क्रीडा व युवक सेवा संचलनालय, पुणे आयोजित शासकीय रोलर स्केटींग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यात इ. ७ वी तील विद्यार्थीनीने सहभाग नोंदवला.

**※ दिनांक २९ सप्टेंबर २०२५ –**

रोजी शालेय टेनिक्राईट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यात १४ वर्षे आतील मुले व मुली तसेच १७ वर्षे आतील मुले व मुली असे संघ सहभागी झाले.

**※ दिनांक १ ऑक्टोबर २०२५ –**

रोजी शासकीय शालेय जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये इ.७ वी तील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

**※ दिनांक ३ ऑक्टोबर २०२५ –**

रोजी क्रीडा व युवक सेवा संचलनालय, पुणे आयोजित शासकीय जिल्हास्तरीय हॅन्डबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यात इ. ८ वी ची विद्यार्थिनी कु. श्रावणी मनोहर भोपे हिची विभागस्तरावर निवड झाली.

**※ दिनांक १८ ऑक्टोबर २०२५ –**

रोजी शासकीय जिल्हास्तरीय तलवारबाजी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत १४ वर्षे वयोगटातील कु. श्रावणी मनोहर भोपे, कु. आराध्या विनोद सानप, कु. देवयानी शाम सोनार, कु. अर्शती केदार चावरे, कु. सानवी सुधीर मगर, चि. कार्तिक ज्ञानेश्वर पाटील व चि. क्रियांश किशोर वाघ व १७ वर्षे वयोगटातील कु. कश्यपी चेतन चौधरी व चि. यशराज ज्ञानेश्वर महाजन या विद्यार्थ्यांची विभागीय स्तरावर निवड झाली.

**※ विभागीय मिनी गोल्फ स्पर्धा, जळगाव**

| खेळाडूंचे नाव | खेळाचे नाव | प्राविण्य |
|---|---|---|
| १) कु. सावनी तुषार मुजुमदार | मिनी गोल्फ | विजयी |
| २) चि. श्लोक राजीव पाटील | मिनी गोल्फ | विजयी |

**※ विभागीय हॅन्डबॉल स्पर्धा,धुळे**

| खेळाडूंचे नाव | खेळाचे नाव | प्राविण्य |
|---|---|---|
| १) कु. श्रावणी मनोहर भोपे | हॅन्डबॉल | सहभाग |

**※ शालेय राज्यस्तरीय मिनी गोल्फ स्पर्धा, नागपूर**

| खेळाडूंचे नाव | खेळाचे नाव | प्राविण्य |
|---|---|---|
| १) कु. कश्यपी चेतन चौधरी | मिनी गोल्फ | रौप्य, कास्य पदक |
| २) कु. श्रावणी मनोहर भोपे | मिनी गोल्फ | रौप्य, कास्य पदक |
| ३) कु. श्रावणी राजेंद्र पाटील | मिनी गोल्फ | कास्य पदक |
| ४) कु. केशवी अविनाश पाटील | मिनी गोल्फ | सुवर्ण, रौप्य, कास्य पदक |
| ५) कु. आराध्या विनोद सानप | मिनी गोल्फ | कास्य पदक |
| ६) कु. अक्षदा शरद भोईटे | मिनी गोल्फ | सुवर्ण पदक |
| ७) कु. मुक्ता सतिश देशमुख | मिनी गोल्फ | रौप्य, कास्य पदक |
| ८) कु. डिंपल श्रीराम निकम | मिनी गोल्फ | कास्य पदक |
| ९) चि. कार्तिक ज्ञानेश्वर पाटील | मिनी गोल्फ | सुवर्ण पदक |
| १०) चि. वैभव तुकाराम हरबा | मिनी गोल्फ | रौप्य पदक |
| ११) चि. साहील बापू उदीकर | मिनी गोल्फ | सुवर्ण पदक |
| १२) चि. हर्षवर्धन अविनाश घुगे | मिनी गोल्फ | सुवर्ण, रौप्य, कास्य |
| १३) चि. ज्ञानेश्वर योगेश शिंदे | मिनी गोल्फ | सुवर्ण पदक |

**※ राष्ट्रीय शालेय मिनी गोल्फ स्पर्धा,**

| खेळाडूंचे नाव | खेळाचे नाव | प्राविण्य |
|---|---|---|
| १) कु. कश्यपी चेतन चौधरी | मिनी गोल्फ | रौप्य, सुवर्ण पदक |
| २) कु. श्रावणी राजेंद्र पाटील | मिनी गोल्फ | कास्य पदक |
| ३) कु. केशवी अविनाश पाटील | मिनी गोल्फ | कास्य पदक |
| ४) कु. आराध्या विनोद सानप | मिनी गोल्फ | सुवर्ण पदक |
| ६) कु. अक्षदा शरद भोईटे | मिनी गोल्फ | रौप्य पदक |
| ७) कु. मुक्ता सतिश देशमुख | मिनी गोल्फ | रौप्य, कास्य पदक |
| ८) कु. डिंपल श्रीराम निकम | मिनी गोल्फ | सुवर्ण पदक |
| ९) चि. कार्तिक ज्ञानेश्वर पाटील | मिनी गोल्फ | रौप्य पदक |

## व्याख्याने

**※ दिनांक २० जून २०२५ –**

रोजी योगगुरु श्री. सुभाष वामन पिंगळे यांचे योगशास्त्राचे महत्त्व सांगणारे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यात त्यांनी काही योगासने ही करुन दाखविली.

**※ दिनांक ४ जुलै २०२५ –**

रोजी विद्यालयात संस्कृत शिक्षिका स. भ. सौ. शीतल देशपांडे यांचे पहिले कीर्तन आयोजित करण्यात आले होते. त्यांनी कीर्तन अतिशय प्रभावी व ओघवत्या भाषेत सादर केले.

**※ दिनांक १६ जुलै २०२५ –**

रोजी इ. ७ वी ते ९ वी च्या विद्यार्थिनींसाठी डॉ. विरजा देशमुख यांचे 'कळी उमलतांना' हे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

तसेच इ. ७ वी ते ९ वी च्या विद्यार्थ्यांसाठी डॉ. संदीप देशमुख यांचे 'पौगांडावस्थेत होणारे शारीरिक बदल' यावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

**※ दिनांक १७ जुलै २०२५ –**

रोजी विद्यालयातील माजी विद्यार्थीनी कु. शिवानी आर्य हिचे व्यवसाय मार्गदर्शनावर आधारित व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यात तिने फिजिओथेरेपी मधील संधी आणि मॉडेलिंग संदर्भात माहिती दिली.

**※ दिनांक २६ जुलै २०२५ –**

रोजी गुरुपौर्णिमेनिमित्त माननीय श्री. नरेश निकुंभ यांचे शिक्षकांसाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यांनी भारतभूमी ची थोरवी, गुरु शिष्य परंपरा, वेदग्रंथांचे महत्त्व, भारतातील शौर्यगाथा, भारतातील ज्ञान परंपरा याबद्दल मार्गदर्शन केले.

# संवाद

**※ दिनांक २७ जुलै २०२५ –**

रोजी विद्यालयात चाळीसगाव पोलीस स्टेशनचे ए. पी. आय. श्री. शंकर मुटेकर साहेब यांनी विद्यार्थ्यांमधील वाढती व्यसनाधीनता तसेच विद्यार्थिनींना आत्मसुरक्षितेविषयी माहिती दिली. तसेच रोटरी क्लब ऑफ रॉयलच्या अध्यक्षा सौ. विरजा देशमुख यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. व शेठ नारायण बंकट वाचनालयाचे अध्यक्ष व रंगगंध कलासक्त न्यासचे संस्थापक डॉ. श्री. मुकूंद करंबेळकर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**※ दिनांक २८ जुलै २०२५ –**

रोजी कारगिल विजय दिवसानिमित्त शाळेतील शिक्षक श्री. विवेक देशपांडे सर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यांनी कारगिल युद्धाची स्थिती, त्यावेळचे प्रमुख अधिकारी, बंदुकीचे प्रकार याबद्दल माहिती दिली.

**※ दिनांक ३ नोव्हेंबर २०२५ –**

रोजी गुरुकुल ट्रस्टचे विश्वस्त मा. डॉ. श्री. विवेक काटदरे सरांचे प्राथमिक, माध्यमिक तसेच बालवाडीच्या शिक्षकांसाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यांनी वेगवेगळ्या विषयांवर शिक्षकांना मार्गदर्शन केले.

**※ दिनांक १ जानेवारी २०२६ –**

रोजी ता. सा. मा. विद्यालयातर्फे चारही विभागाच्या शिक्षक व शिक्षकेतर वृंदासाठी मा. डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, नागपूर यांचे 'संवाद कौशल्य' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

**※ दिनांक २ जानेवारी २०२६ –**

रोजी इ. ७ वी ते ९ वी या वर्गासाठी मा. डॉ. अरुणा टिळक यांचे 'निरोगी रहा व व्यक्तिमत्त्व घडवा' यावर व्याख्यान संपन्न झाले.

**※ दिनांक ५ जानेवारी २०२६ –**

रोजी पद्मश्री पुरस्कृत मा. चैत्रामजी पवार यांची मुलाखत विद्यालयातील शिक्षिका सौ. संध्या दर्प व शिक्षक श्री. रवींद्र देशपांडे यांनी घेतली. या मुलाखतीचे प्रायोजकत्व प्रा. श्री. कर्णिक सर व परिवार यांनी घेतले होते.

**※ दिनांक ८ जानेवारी २०२६ –**

रोजी विद्यालयात इ. ५ वी ते ९ वीच्या च्या वर्गासाठी प्रसिद्ध बर्डमॅन श्री. सुमेध वाघमारे यांचे प्रेरणादायी व मनोरंजक व्याख्यान संपन्न झाले.

**※ दिनांक ९ जानेवारी २०२६ –**

रोजी 'राज्यघटना' या विषयावर श्री. अविनाश कोल्हे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

## संवाद

**※ दिनांक ३१ जानेवारी २०२६ –**

रोजी गुरुकूल ट्रस्टतर्फे तीनही विभागाच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी गुरुकुल ट्रस्टच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख मा. श्रीमती सुनितताई घाटे यांचे 'आनंद तरंग' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

**※ दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ –**

रोजी विद्यालयात मराठी विज्ञान परिषद आणि रसायन तंत्रज्ञान संस्था, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने कु. गायत्री कांतिलाल महाजन यांचे 'संशोधनाकडे वळा' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

**※ दिनांक २० फेब्रुवारी २०२६ –**

रोजी विद्यालयात ता. सा. मा. वि. आणि जीवन विद्या मिशन नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने, विद्यार्थ्यांसाठी श्री. आत्माराम कोयंडे सर यांचे 'अभ्यासाचे महत्त्व' या विषयावर व्याख्यान संपन्न झाले.

**※ दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ –**

रोजी विद्यालयात इनरव्हिल क्लब तर्फे राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त व्याख्यान आयोजित करण्यात आले. यामध्ये मा. श्रीमती नीता सामंत यांनी मानवी जीवनात 'विज्ञानाचे महत्त्व' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## प्रयोग शाळा

सध्याचे युग हे विज्ञान व तंत्रज्ञानाचे युग आहे. विज्ञान शिक्षण हे थिअरी पेक्षा प्रत्यक्ष प्रयोगाने अधिक सोपे व प्रभावी होते. याच तत्त्वाला अनुसरून तात्यासाहेब सामंत मा. विदयालयात अतिशय अद्ययावत अशी विज्ञान प्रयोगशाळा उभारली आहे.

प्रयोग शाळेत इ.५ वी ते इ.१० वीच्या प्रयोग पुस्तिकेतील सर्व प्रयोग विदयार्थी स्वतः करतात. त्यासाठी लागणारे साहित्य व उपकरणे पुरेश्या प्रमाणात उपलब्ध आहेत. प्रयोगशाळेत STEM Learning चे मिनी सायन्स सेंटर आहे.

प्रयोगशाळा मोकळी व हवेशीर असून भरपूर पाणी उपलब्ध आहे. प्रयोगशाळेसाठी उच्चशिक्षित प्रयोगशाळा परिचर पूर्ण वेळेसाठी नियुक्त आहे.

**सौ. भाग्यश्री अ. पाटील (प्रयोगशाळा परिचर)**

# शिक्षकांचे यश, निवड व प्रशिक्षण

**※ दिनांक ९ जून २०२५ –**

रोजी शाळेतील शिक्षिका सौ. शीतल देशपांडे आणि सौ. वैशाली कुलकर्णी यांनी 'समृद्ध शिक्षण धोरणाची दिशा' **NEP-2020** यावर सर्व शिक्षकांना प्रशिक्षण दिले.

सौ. वैशाली कुलकर्णी यांनी नवीन शैक्षणिक धोरणावर मार्गदर्शन केले, तसेच सौ. शितल देशपांडे मॅडम यांनी 'पंचकोश विकसन' यावर प्रशिक्षण दिले.

**※ दिनांक १० जून २०२५ व ११ जून २०२५ –**

या दोन दिवशी विद्यालयात शिक्षकांसाठी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. शैक्षणिक उपक्रम संशोधन केंद्र ज्ञान प्रबोधिनी पुणे येथील श्री. नचिकेत नित्सुरे यांनी **'प्रकल्प प्रक्रिया'** यावर मार्गदर्शन केले.

**※ दिनांक १३ जून २०२५ –**

रोजी हरणाताई जोशी प्राथमिक विद्यालयातील शिक्षक श्री. मनोज सूर्यवंशी सर यांनी सर्व शिक्षकांना 'कॅन्व्हा' या मोबाईल ॲपवर प्रशिक्षण दिले.

**※ दिनांक २० सप्टेंबर २०२५ –**

रोजी कु. गौरी कुलकर्णी यांनी सर्व शिक्षकांना **'डिजीटल मार्केटींग'** या विषयावर प्रशिक्षण दिले.

**※ दिनांक १७, १८ व १९ नोव्हेंबर २०२५ –**

रोजी श्री. प्र. दे. चित्ते सरांनी मूल्यवर्धन प्रशिक्षण पूर्ण केले.

**※ दिनांक २४, २५ व २६ नोव्हेंबर २०२५ –**

रोजी श्री. अ. प्र. देवरे आणि सौ. मा. प्र. कुलकर्णी यांनी मूल्यवर्धक प्रशिक्षण पूर्ण केले.

**※ दिनांक २७, २८, २९ नोव्हेंबर २०२५ –**

रोजी श्री. अ. सु. येवले सरांनी मूल्यवर्धन प्रशिक्षण पूर्ण केले.

**※ दिनांक ४ नोव्हेंबर २०२५ –**

रोजी कु. गौरी कुलकर्णी यांनी मोबाईल मधील 'कॅन्व्हा इनशॉट' यांसारखे विविध ॲप वापरण्यासंबंधी प्रशिक्षण दिले.

**※ निरोप समारंभ – दिनांक ३१ जानेवारी २०२६ –**

रोजी तात्यासाहेब सामंत माध्यमिक विद्यालयाचे वरीष्ठ लिपिक श्री. दीपक देशपांडे सर हे ३३ वर्षे सेवेतून सेवानिवृत्त झाले. त्यांचा सेवापूर्ती निरोप समारंभ विद्यालयात आयोजित करण्यात आला होता. या समारंभास मा. देशपांडे सर सहपरिवार उपस्थित होते. कार्यक्रम अतिशय हृदयस्पर्शी पद्धतीने पार पडला, चारही विभागातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच त्यांची कन्या यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

# शालेय ग्रंथालय

## ''आमच्या विद्यालयातील अद्ययावत ग्रंथालय - ज्ञानाचा समृद्ध स्त्रोत''

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात वाचन संस्कृतीला विशेष महत्त्व आहे, याची जाणीव ठेवून विद्यालयात अलीकडेच नाविन्यपूर्ण ग्रंथालयाची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. ग्रंथालयात विविध विषयांवरील समृद्ध पुस्तकसंग्रह उपलब्ध आहे. साहित्य, विज्ञान, इतिहास, भूगोल, चरित्रे, प्रेरणादायी पुस्तके तसेच विविध स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शक पुस्तके, दुर्मिळ संदर्भ ग्रंथ, संस्कृत अमरकोष, गीर्वाण लघुकोष यांचा समावेश आहे. ग्रंथालयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी यासाठी विविध उपक्रम सातत्याने राबविले जातात उदा. उन्हाळी सुटीत एक महिना व दिवाळी सुटीत २० दिवस या प्रमाणे शाळेच्या आवारात अथवा घरी वाचनासाठी पुस्तके उपलब्ध करून दिली जातात. वाचन प्रेरणा दिन, पुस्तक प्रदर्शन, कथा सांगणे, निबंध लेखन व पुस्तक परीक्षण स्पर्धा अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीला चालना मिळते. या उपक्रमांत विद्यार्थी उत्साहाने सहभागी होऊन आपले ज्ञान वाढवत आहेत.

याशिवाय, ग्रंथालय विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनाची सवय लावण्यास, चिंतनशील वृत्ती विकसित करण्यास आणि आत्मविश्वास वाढविण्यास मोठ्या प्रमाणात मदत करते. अनेक विद्यार्थी नियमित वाचनातून स्वतःचा बौद्धिक विकास करत असून विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश मिळवत आहेत. विद्यालयाचे संस्थाचालक, मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग आणि कर्मचारी यांच्या सहकार्यामुळे ग्रंथालयाचे कार्य अधिक व्यापकतेने तसेच कल्पकता, विकसनाचे साधन म्हणून पुस्तकांचा वापर प्रभावीपणे पार पडत आहे. भविष्यातही विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृद्धीसाठी आणि वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी ग्रंथालयातून विविध उपक्रम राबविण्याचा आमचा मानस आहे.

अशा प्रकारे, आमच्या विद्यालयातील समृद्ध ग्रंथालय आहे.

शालेय ग्रंथालयास खालील प्रमाणे पुस्तकं उपलब्ध आहेत.

| | |
|---|---|
| शिक्षक ग्रंथालय – | ५,४६७ |
| विद्यार्थी ग्रंथालय – | ९,३६१ |
| संदर्भ ग्रंथालय – | १,३०६ |
| स्पर्धा विभाग – | ६११ |
| एकूण – | १६,७४५ |
| भेट पुस्तके – | २५० |

**ग्रंथपाल – श्री.मोहन पाटील,**

तात्यासाहेब सामंत माध्यमिक विद्यालय, चाळीसगाव